माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: ४२७/२०१९ व ६०/२०२०**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. हेमंत देवराव गांजरे, ८७, विठ्ठलनगर २, नागपूर-४४००३४ | शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, नागपूर | शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, नागपूर |

**सुनावणी दिनांक २४.०२.२०२५**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. २९८२/२०१८ संदर्भात दिनांक ०४.१२.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे एकुण दोन तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. सदर तक्रारीवर दिनांक ३०.०३.२०२२, दि. ०८.०८.२०२२ व दि. १६.११.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर आज दिनांक २४.०२.२०२५ रोजी पुनश्च: सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२, श्री. प्रमोद एन. नाट उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधीलकलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. २९८२/२०१८ मध्ये दिनांक ०४.१२.२०१८ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(१) चा भंग केला असे प्रथम दर्शनी निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) अन्वये शास्ती का करु नये? याचा खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगास सादर करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपील अर्जाच्या अनुषंगाने ४५ दिवसात सुनावणी घेऊन आदेश पारीत करणे अपेक्षीत आहे. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी घेतलेली नसल्याचे निदर्शनास येत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(६) चा भंग केलेला आहे. त्यासाठी सामान्य् प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य शासन दिनांक १० जून, २००८ रोजीचे परिपत्रक व कलम १९(८)(ग) व २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करु नये, याचा खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात आयोगास सादर करावा. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसात अपिलार्थीस माहिती अर्जात नमुद असलेली माहिती कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोहच आयोगास पाठवावी." असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले होते.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत (तक्रार क्र. ४२७/२०१९) संदर्भात दिनांक २९.०७.२०१९ व (तक्रार क्र. ६०/२०२०) संदर्भात दिनांक १३.०२.२०२० रोजी आयोगाकडे एकुण दोन तक्रार अर्ज दाखल केले

आहे. त्यामध्ये " आदेशात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजूनही मला कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनेक कलमांचा अनेकदा भंग जाणूनबुजून केलेला आहे. अपील आदेशानंतर सुध्दा आणि आयोगाचे आदेशामधील सुचनापत्राला सुध्दा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केराची टोपली दाखविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) चा भंग केल्यामुळे कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार आदेशात नमूद केल्याप्रमाणे शास्ती करण्यात यावी. तसेच कलम १९(६) चा भंग केल्यामुळे साप्रवि महा राष्ट्र शासन कलम १८(८)(ग) व २०(२) आदेशात नमूद शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. मानसिक त्रासापोटी रु. १०,००० इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी " असे नमुद करुन तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर, श्रीमती रोहिणी कुंभार यांनी दिनांक २५.०३.२०२२ अन्वये आयोगास सादर केलेल्या खुलाश्यात, "अपील क्र. २९८२/२०१८, दिनांक ०४.१२.२०१८ च्या आदेशामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे अपिलकर्ता यांना त्यांचे मुळ माहिती अर्ज दिनांक २६.०७.२०१८ अन्वये मागितलेली माहिती कार्यालयाचे दिनांक ११.०६.२०२१ च्या पत्रान्वये अपिलार्थीस व्यक्तिश: पुरविण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थी यांचे समाधान झालेले आहे. त्याबाबतचे अनुपालन आयोगास सादर करण्यात आले आहे. सदर प्रकरणी मा. आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही पूर्ण झालेली असून कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही. तरी सदर तक्रार निकाली काढण्यात यावी. हि विनंती" असे नमुद केले आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तक्रारकर्ता यांनी व्दितीय अपील क्र. २९८२/२०१८ संदर्भात आयोगाकडे एकुण दोन तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तक्रारकर्ता यांना दिनांक २६.०७.२०१८ च्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२ यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन देवून एकुण २१ पानांची माहिती पुरविण्यात येत आहे, असे दिनांक ११.०६.२०२१ च्या पत्रान्वये कळविल्याचे दिसून येते. तसेच तक्रारकर्ता यांनी सदर पत्रावर "२१ पानांची माहिती मिळाली व समाधान झाले" असे नमुद करुन स्वाक्षरीनिशी पोहच दिलेली आहे. तसेच सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती मिळाली असून माझे समाधान झाले असे स्पष्ट केले असल्यामुळे सदर प्रकरणी तक्रार पुढील चौकशी योग्य नसून प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
★ नागपूर ★

**ठिकाण :** **नागपूर**
**दिनांक:** **२४.०२.२०२५**

**जा.क्र.** 1930 **दि.** 15 APR 2025

E:\तक्रार क्र. 427-2019 व 60-2020.docx